# HOMOEOPATHIC ACADEMY OF RESEARCH & CHARITIES PARBHANI

## ANNUAL REPORT

## FINANCIAL YEAR 2017-18


| | |
|---|---|
| **Society Reg. No.** | : MH-943/2008(Parbhani) |
| **Trust Reg. No.** | : F-9440 (Parbhani) |
| **Pan card No.** | : AABTH0608Q |
| **12AA(1) Registration No.** | : औ./आ.आ/तकनीकी/12A(1)/162/79/2012-13 |
| **80G(5) Registration No.** | : औ./आ.आ/तकनीकी/80G(5)/वि.सं.सं./162/79/2012-13 |

# HOMOEOPATHIC ACADEMY OF RESEARCH & CHARITIES, PARBHANI

**Head Office :** 'Shradha', Vishnu Nagar, Basmat Road, Parbhani - 431 401. MS. Maharashtra, India.
Email: harctrust@gmail.com Tel: 02452-222261 Cell: +91-9422924861

## Trust Account Details :

**A/c Name : Homoeopathic Academy of Research and Charities**

**Account No:** 31997507742 **IFSC:** SBIN0003667
**Bank :** State Bank of India **Branch:** Parbhani Main

## BOARD OF TRUSTEE

**President** : **Dr. Pawan Satyanarayan Chandak**
***BHMS***

**Vice-President** : **Dr. Shailesh Badrinarayan Mantri**
***BHMS***

**Secretary** : **Dr. Sachin Sitaram Mantri**
***MBBS***

**Joint Secretary** : **Mr. Vijay Jayram Tapdiya**
***B.Com.***

**Treasurer** : **Mr. Vinay Govindprasad Mantri**

**Members** : **Dr. Mrs. Asha Pawan Chandak**
***BHMS***

**Dr. Mrs. Sunita Shailesh Mantri**
***BAMS***

**Mr. Shyam Narayanrao Saraf**
***BA***

**Legal Advisor** : **Adv. Munjappa Kondiba Ubale**
***LLM***

## Aims & Objectives :

- To serve the human society by providing preventive, curative and palliative care based on principles of homoeopathy, with special focus on socially and economically weaker sections.
- To stand for integrated medical research in homoeopathy.
- Epidemiological survey of different diseases to find out the most suitable medicine for prevention and eradication.
- To do scientific research in critical illness like AIDS, Diabetes, Heart Disease, Cancer etc.
- To conduct health awareness programs especially in AIDS, Alcohol and drug addiction etc.
- To take research project related to medical and paramedical subject.
- To promote and advance homoeopathic system of medicine and allied sciences and to benefit and improve public health thereby.
- Conduct educational campaign among the people of the state in the matter of public health and sanitation awareness.
- Organize medical and preventive camps in various rural areas like Villages, Slum areas etc.
- To educate & bring awareness amongst people about Homoeopathy & Health.
- To integrate concepts of Homoeopathy, Ayurveda, Yoga and Modern Medicine in prevention and treatment of diseases. And to undertake research to prove validity of such holistic approach.
- Rehabilitation of Persons suffering from Critical illness like HIV/AIDS, Cancer etc by providing them medical, Nutritional, Educational & Residential Care & support
- To Establish, Build or Manage Hospital, Day Care Centre, Rehabilitation centers, Balgruh or Child Care centre or Children's Home, Counseling Centers for Patients & Person suffering from Critical Illness like HIV/AIDS & Cancer etc.
- To Help PLHIV, Orphans, Old Age Persons, Street Children, Children of Divorcee Couples, Tribal People, Poor Socioeconomic, Underprivileged, Widows, Socially Backward & Neglected, Handicaps, Mentally Retarded, Person suffering from Critical Illness, Children of Female Sex workers, Families of Martyrs and Prisoners by providing them Nutritional, Educational, Medical & Residential Care & Rehabilitation supports.
- To Issue Appeal Raise Funds and accepts Gifts, Donation, Subscription in cash or Kind and any property either movable or Immovable for the achievement of the objective of the Charitable Trust.
- To Build, Develop & Start Orphanage, Hospitals, Day Care Centers, Rehabilitation Centre for PLHIV, Persons suffering from Critical illness like HIV/AIDS, Cancer patients, Handicaps, Community Care Centers for AIDS patients, Counseling Centers, Helpline for Children & women, Shelter Home, De-addiction centers, School or Educational centre for Socially & economically backward children, Old Age Home, Vocational Training Centre etc.
- To form self help group & Network for Person Suffering from HIV/AIDS & organize various social, Educational & Health & Medical, Sanitation & Vocational Training & Guidance Activities to bring their active participation & to improve their help Health & Educational & Complete Well being.
- To start Publishing & Printing Periodicals, Journals, magazines etc Publication to promote awareness on Homoeopathy, HIV & AIDS, Cancer, Human Rights, Child & Women Rights, Alcohol & Tobacco Addiction & various Health, Medical & Social Issues.

## Supportive Treatment to AIDS patients especially Orphan children :

With Homoeopathic Medicines we have tried to concentrate on Supportive management like Multivitamins, Antioxidants, Multiminerals, Haematinics, and In Diarrhoea cases Oral Rehydrating fluid given.

For poor & orphan children we had started Nutritious food diets & supplements, Milk, Biscuits, daily needed things like toothpaste, toothbrush, soap, washing powder, coconut oil, petroleum jelly, Sprout diet like Matki, Groundnut, GUD, Chana, Sugar, Rice, cleansing material like Phenol, Savalon liquid from our Trust.

Psychological Counseling & Support: As patients are depressed & have no hope for living Life in that cases we had given & giving constant psychotherapy, Meditation, Positive attitude towards life, Educational programs, Sex education, Sports, Exercises, Yoga, Pranayamas etc.

## Sahara Anathalay Baalgram Gevrai visit & support on 16th April 2017



# सहारा अनाथालयातील मुलांना साहित्य वाटप

परभणी : येथील होमियोपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट या संस्थेच्या वतीने गेवराई येथील बालग्राम, सहारा अनाथलयातील मुलांना खेळाचे साहित्य वितरित करण्यात आले.

गेवराई येथे सहारा अनाथलयात संतोष गर्जे व प्रिती गर्जे आठ वर्षापासून ७८ अनाथ मुलांचा सांभाळ करीत आहेत. दोन दिवसांपूर्वी परभणी येथील होमियोपॅथिक अकादमीचे डॉ. पवन चांडक व डॉ.आशा चांडक यांनी या अनाथलयास भेट दिली. दिवसभर मुलांशी संवाद साधला. त्यानंतर अनाथलयातील ७८ मुलांना उन्हाळ्याच्या सुटीत खेळण्यासाठी बॅडमिंटन कीट, बुद्धीबळ संच या साहित्याच्या खेळाबरोबच पोषक आहार व फळांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास संतोष गर्जे, प्रिती गर्जे, सत्यनारायण चांडक, बसंती चांडक यांच्यासह सहारा अनाथालयाची टीम उपस्थित होती. होमियोपॅथिक अकादमीचे डॉ. पवन चांडक हे मागील आठ वर्षापासून एचआयव्ही बाधित बालकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, आरोग्य, पूनर्वसन या विषयावर काम करीत आहेत. यातूनच ठिकठिकाणच्या अनाथ, उपेक्षित बालकांच्या पूनर्वसनासाठी संस्थेच्या माध्यमातून मदत केली जाते.

On 16th April 2017 Team of Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) including DR Pawan Chandak, Dr Asha Chandak & Family visited Orphanage run by Santosh Garje named 'Sahara Anathalay' Baalgram, Gevrai Dist Beed. In these orphanage more than 78 orphans children are rehabilitated. HARC President & Team donated Sports & various Indoor & outdoor games & Seasonal Fruits to them for Nutritional Needs. HARC spent whole day with them to understand their work, day to day problems etc.

## HARC donates 3 Shilai Machine for Vocational Training of PLHIV Students





**होमियोपॅथिक अकादमीचा उपक्रम; व्यावसायिक प्रशिक्षणासाठी दिल्या शिलाई मशीन**

# सेवालयातील मुलांसाठी परभणीतून मदत

परभणी : लातूर जिल्ह्यातील हासेगाव येथे सुरु असलेल्या सेवालय प्रकल्पातील मुलांच्या रोजगारासाठी परभणी येथील होमियोपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च ॲण्ड चॅरिटीज या संस्थेने मदतीचा हा पुढे केला आहे.

आम्ही सेवक संस्था हासेगाव संचलित सेवालय या प्रकल्पात १८ वर्षे पूर्ण झालेल्या एचआयव्ही बाधित विद्यार्थ्यांसाठी 'हॅपी इंडियन व्हिलेज' हा प्रकल्प सुरु करण्यात आला आहे.

सध्या या ठिकाणी २४ मुले आणि मुली वास्तव्याला आहेत. कुठलेही अनुदान नसताना एचआयव्ही बाधित मुलांच्या पुनर्वसनासाठी देशातील हे पहिलेच केंद्र ठरत आहे. सध्या या मुलांना हॅपी म्युझिक शो व शेती हेच उत्पन्नाचे साधन आहे.

- परभणी शहरातील जीवनरेखा बालगृहातील मुले २०१४ मध्ये सेवालय या प्रकल्पात स्थलांतरित झाले आहेत. तेव्हापासून होमियोपॅथिक अकादमीच्या वतीने सातत्याने या मुलांना मदत केली जाते. शिक्षण, आरोग्य आणि पुनर्वसन या तीन बाबींवर वेळोवेळी पाऊले उचलली जातात. या मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनवावे, या उद्देशाने ही मदत केली असल्याचे अकादमीचे अध्यक्ष डॉ.पवन चांडक यांनी सांगितले. विशेष म्हणजे, या उपक्रमासाठी पैठण येथील लखोटिया परिवाराने एका सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून ८ हजार २० रुपयांची मदत प्रकल्पासाठी केली आहे.
- याकामी मनोज कुचेरिया, योगेश बलदवा, संतोष वट्टमवार, संतोष इंगळे, राजेश जैन, विलास जोशी यांचे सहकार्य लाभले. यशस्वीतेसाठी डॉ.पवन चांडक, रवि बापटले, स्नेहा शिंदे, मंदोदरी शिंदे यांनी प्रयत्न केले.

भविष्यात या मुलांनी स्वावलंबी बनावे, उत्पन्नाचा चांगला स्रोत मिळवून मुलांना स्वतःच्या पायावर स्वाभिमानाने जगता यावे, यासाठी प्रकल्पाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. त्यातूनच प्रा.मंदोदरी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिलाई मशीनवर प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याचा मानस केंद्राचे रवि बापटले यांनी व्यक्त केला. त्यांच्या या संकल्पनेला प्रतिसाद देत परभणी येथील होमियोपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च ॲण्ड चॅरिटीज या संस्थेने तीन शिलाई मशीन या प्रकल्पासाठी देऊ केल्या आहेत. (प्रतिनिधी)

In April 2017 3 Shilai Machine donated to Aamhi Sevak Sanstha at Sevalaya Hasegaon, Latur. At Hasegaon, Latur Ravi Baptale through his NGO Aamhi Sevak taking care of more than 70 PLHIV students. Out of 70 total HIV students in this NGO more than 15 students are above 18 years of age. So to make these students self Independent Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) Parbhani decided to donate 3 Shilai Machine to them. Due to which Vocational training can be given to them to make these students self Independent by making various things like Dress, Cotton Bags, Sari Bags various hand & Machine made items. After selling these manufactured items by in market, these students of Sevalaya can get earning also. So HARC decided to promote Earn & Learn scheme in association with Aamhi Sevak Sanstha Latur.

# HARC donates 3 Shilai Machine for Vocational Training of PLHIV Students

दैनिक दिव्य मराठी
महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र
एकूण पाने : १२+४=१६ | किंमत ₹ ४.०० | वर्ष ६ | अंक ३२२ | महानगर
औरंगाबाद गुरुवार, २० एप्रिल २०१७

## सांस्कृतिक कार्यक्रमातून एचआयव्हीबाधितांना मदत

प्रतिनिधी | परभणी

पैठण येथील अजिंक्य लॉन येथे लखोटिया परिवाराच्या विवाह सोहळ्यातील संगीत संध्या या कार्यक्रमात जमा झालेले ओवाळणीचे पैसे एका चांगल्या कार्यासाठी देण्याचा संकल्प लखोटिया परिवाराने करून तो प्रत्यक्षात आणला. ओवाळणीतून जमा झालेल्या ८ हजार २० रुपयांतून दोन शिलाई मशीन लातूरच्या सेवालय या एचआयव्हीबाधितांसाठी कार्य करणाऱ्या संस्थेला देण्यात आल्या.

प्रकाशवाटा या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सेवालय, लातूर येथील ७१ एचआयव्हीबाधित विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार व प्रशिक्षणासाठी पाच शिलाई मशीन देण्याचे आवाहन येथील होमिओपॅथिक अॅकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज या संस्थेचे डॉ. पवन चांडक यांनी केले होते. होमिओपॅथिक अॅकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज ही संस्था एचआयव्हीबाधित अनाथ बालकांच्या शिक्षण, आरोग्य व पुनर्वसन या विषयावर कार्य करत असून सायकलिंगच्या माध्यमातून देशभर एड्सविषयी जनजागृती करतात.

या आवाहनाला प्रतिसाद देत एक आगळीवेगळी सामाजिक बांधिलकी या लखोटिया कुटुंबाने जपली. या ओवाळणीतून ८०२० रुपये इतकी जमा झालेली रक्कम लखोटिया परिवाराने डॉ. पवन चांडक यांच्याकडे सुपूर्द केली. या जमा झालेल्या निधीतून होमिओपॅथिक अॅकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज या संस्थेने सेवालय प्रकल्प लातूरला २ शिलाई मशीन दिल्या. या शिलाई मशीनचा उपयोग सेवाल्यातील एचआयव्हीबाधित मुलींना स्वयंरोजगार व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या यशासाठी लक्ष्मीकांत लखोटिया, राधेश्याम सारडा, सागर लखोटिया, सुभाष लखोटिया व कुटुंबाने प्रयत्न केले.

**Location** : Paithan Dist Aurangabad, Aamhi Sevak Sanstha Hasegaon Latur

**Number of Beneficiary** : 3 Shilai Machine Given for Vocational Training for PLHIV Students of Sevalay

## Happy Music of PLHIV students organized at Sakoli, Bhandara
## HARC Trust donated RS 1,35,720/- to Aamhi Sevak Sanstha Latur

पुढारी



परभणी : साकोलीकरांच्या मदतीतून १ लाख ३५ हजारांचा धनादेश सेवालयाकडे खा.नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते सेवालयाचे प्रा.रवी बापटले यांना सुपूर्द करण्यात आला. यावेळी होमिओपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीजचे अध्यक्ष डॉ.पवन चांडक, सत्यनारायण चांडक आदी.

# सेवालयास १ लाख ३५ हजारांची मदत

## परभणीतील चांडक यांचा सेवानिवृत्तीनिमित्त उपक्रम

परभणी : प्रतिनिधी

येथील सत्यनारायण चांडक यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सेवालयास एच.ए.आर.सी.तर्फे १ लाख ३५ हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे.

भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे होमिओपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज परभणीच्या वतीने भारतीय स्टेट बँकेचे शाखा प्रबंधक सत्यनारायण चांडक यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त महाराष्ट्रात प्रचंड गाजलेला हॅप्पी म्युझिक शोचा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी साकोलीकरांच्या मदतीतून १ लाख ३५ हजाराचा धनादेश सेवालयाकडे खा.नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यात खा नानाभाऊ पटोले यांची ३१ हजाराची मदत होती हे विशेष. प्रास्ताविक होमिओपॅथीक अकादमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीजचे अध्यक्ष डॉ.पवन चांडक यांनी केले. सेवालयाचे संस्थापक प्रा. रवी बापटले यांच्यासह हॅप्पी म्युझिक शो ची नृत्यदिग्दर्शिका स्नेहा शिंदे, प्रा.शिंदे, मंदोदरी शिंदे, नगराध्यक्षा धनवंता राऊत, पोलिस उपअधीक्षक कुलकर्णी, उपविभागीय पोलिस अधिकारी सांखियये, पोलिस निरीक्षक जगदीश गायकवाड, नगरसेवक मनीष कापगते, मुंगुलमारे, वासनिक, शिवकुमार अग्रवाल हे होते. अध्यक्षस्थानी अशोक गुप्ता हे होते. सूत्रसंचालन डॉ. आशा चांडक व ज्योतिबा बडे यांनी केले.

Aurangabad
Page No. 02 May 01, 2017
Powered by: erelego.com

Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) had organized 'Happy Music Show' by PLHIV students of Sevalaya Latur at Home Guard Maidan Sakoli Dist Bhandara on 30th April 2017. In this Program 40 HIV student of Sevalaya had performed Dance on various Maharashtra's traditional dance like Gavlan, Dindi, Waghya Murli, Rajasthani, Aadivasi, Laavni etc & appreciated by thousand people of Sakoli. In this program through voluntary donations HARC Trust donated RS 135720/- to Aamhi Sevak Sanstha Latur for Treatment & Rehabilitation needs of Happy Indian Village of Sevalaya Project. In Presence of Hon M.P. Nana Patole cheque of 135721/- given to Ravi Baptale founder of Sevalaya, Latur.

| | |
|---|---|
| **Location** | : Home Ground Maidan Sakoli Dist Bhandara |
| **Number of Beneficiary** | : 66 PLHIV patients of Sevalay Hasegaon Latur |
| **Number of attendance** | : 1000 citizen of Sakoli |
| **Chief Invitee** | : M.P. Nana Patole, Dysp Kulkarni, SDM Sankhiye, Police Inspector Gaikawad, Corporator Manish Kapgate |

## HARC donated RS 22000 to Sevalaya through Mango sales at Parbhani

**होमियोपॅथिक अकादमी; २१ हजार रुपयांच्या आंब्याची विक्री**

# आंबे विक्रीतून एचआयव्ही बाधितांना मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : लातूर जिल्ह्यातील हासेगाव येथे उत्पादित केलेल्या आंब्यांची परभणीत विक्रमी विक्री करुन होमियोपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अँण्ड चॅरीटीज या संस्थेने प्रकल्पाला तब्बल २१ हजार ३०० रुपयांचा हातभार लावला आहे.

हासेगाव येथे एचआयव्ही बाधितांच्या पुनर्वसनासाठी सेवालय प्रकल्प सुरु करण्यात आला. शासन एचआयव्ही बाधितांना उपचारासाठी मदत करीत असले तरी पुनर्वसनासाठी मात्र ठोस पाऊले उचलत नाही. त्यामुळे एचआयव्ही बाधित युवकांचे पुनर्वसन व्हावे आणि ते स्वावलंबी बनून स्वत:च्या पायावर उभे रहावेत, या हेतूने हासेगाव येथे सेवालय प्रकल्पात उपक्रम सुरु करण्यात



लातूर येथील सेवालय प्रकल्पातील आंबे परभणीत स्टॉल लावून विक्री करतानाचे दृश्य.

आला. याचवेळी परभणी येथील जीवन रेखा बालगृहातील मुलांनाही या प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात आले. २००७ मध्ये या प्रकल्पाची सुरुवात झाली. त्यानंतर २००८ मध्ये श्रमसंस्कार शिबिरे घेऊन माळरानावर आंब्यांची रोपे लावली होती. सेवालय प्रकल्पात पाणीटंचाई असतानाही ही झाडे जोपासण्यात आली. मध्यंतरी काही समाजकंटकांनी झाडे जाळण्याचा प्रकारही घडला होता. या सर्व परिस्थितीवर मात करीत आज सेवालयातील झाडे फळांनी लगडली आहेत. सेवालयातील उत्पादित आंबे परभणीच्या बाजारपेठेत विक्री करण्याचा निर्णय होमियोपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अँण्ड चॅरिटीजचे डॉ. पवन चांडक यांनी घेतला. त्यानुसार आतापर्यंत २१३ किलो केशर आंबे १०० रुपये प्रति किलो या दराने विक्री करण्यात आली आहेत. यातून प्राप्त झालेल्या २१ हजार ३०० रुपयांचा धनादेश आम्ही सेवक संस्था, सेवालय लातूर यांना पाठविण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.पवन चांडक, सेवालयाचे संस्थापक रवि बापटले, सत्यनारायण चांडक, प्रणिल नागुरे, प्रा.शिंदे, स्नेहा शिंदे आदींनी प्रयत्न केले.

In Sevalaya more than 200 Mango Trees are naturally cultivated & ripened by PLHIV students. So to make these students self Independent HARC organized Mango Sale stall at Padmawati Tower Parbhani. Mango were sold at rate of RS 100/Kg. HARC raised Fund of Rs 22000 by selling 220 kg mangoes. Cheque of RS 22000 donated to Aamhi Sevak Sanstha, Sevalaya Latur. Hundred of People visited stall & appreciated efforts of HARC Parbhani & Sevalaya Latur.

| | |
|---|---|
| **Location** | : Parbhani |
| **Number of Beneficiary** | : 66 PLHIV orphans of Sevalay, Latur |

# HARC take Educational Responsibility of 71 HIV students of Sevalaya Latur



मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

## एचएआरसीने स्वीकारले ७१ एचआयव्हीग्रस्त विद्यार्थ्यांचे पालकत्व

### शैक्षणिक खर्च करणार; डॉ. पवन चांडक यांची माहिती

वार्ताहर, परभणी

सेवालयातील ७१ एचआयव्हीसह जगणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून त्यांना वर्षभर पुरेल इतके शैक्षणिक साहित्य, वह्या, [illegible], पाठ्यपुस्तके, नवनीत गाईड, चित्रकला साहित्य, शालेय गणवेश, स्टेशनरी, मल्टिव्हिटॅमिन औषधांचे वाटप केले. विशेष म्हणजे बारावीत प्रावीण्यासह उत्तीर्ण झालेल्या २ विद्यार्थ्यांच्या बीबीए या कोर्सची वार्षिक फी भरण्याची माहिती एचएआरसीचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांनी दिली.

हसेगाव, लातूर येथील सेवालय प्रकल्प येथे १० वी, १२ वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा 'आम्ही सेवक' संस्था लातूर व 'होमिओपॅथिक अॅकॅडमी ऑफ रिसर्च अॅण्ड चॅरिटीज संस्थे'तर्फे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, ज्येष्ठ पत्रकार अतुल देऊळगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना चाकूरकर म्हणाले की, जगात अनेकांनी अनेक आजारांवर औषधी शोधली आहेत. त्याच पद्धतीने भविष्यात एचआयव्ही, एड्सवरही उपचार मिळेल. सेवालयाचे काम मनापासून सुरू आहे आणि मनापासून काम करणाऱ्यांना यश निश्चित मिळतेच. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अनेक लोक जगात नावारूपाला आले आहेत. त्याच पद्धतीने सेवालयातील मुलांनी आपल्या आजारावर मात करून यश संपादन करावे. [illegible] कोणताही माणूस [illegible] होत नाही. प्रत्येकाला अडचणी असतातच त्यामुळे सेवालयातील मुलांनीही आपल्या अडचणी आहेत हा विचार सोडून जीवनात वाटचाल करावी असे आवाहन त्यांनी केले.

या भेटीदरम्यान चाकूरकर यांनी मुलांशी मुक्त संवाद साधला. यावेळी एचआयव्हीसारख्या आजारावर मात करत दहावी आणि बारावीच्या सेवालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा चाकूरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास [illegible] संचालिका डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, ज्येष्ठ पत्रकार अतुल देऊळगावकर, कविता पाटील, स्वयंप्रभा पाटील, सेवालयाचे संस्थापक रवी बापटले, [illegible] आदींची उपस्थिती होती.





## HARC take Educational Responsibility of 71 HIV students of Sevalaya Latur



औरंगाबाद, सोलापूर, सातारा, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, परभणी, हिंगोली व बीड येथून प्रकाशित

www.tarunbharat.org

# तरुण भारत

• औरंगाबाद • वर्ष पहिले • अंक ३०१ • बुधवार, २१ जून २०१७ • युगाब्द ५११९ • पाने ८+८ सदाफुलीसह • मूल्य ५ रुपये

## 'एचएआरसी'ने स्विकारले ७१ एचआयव्ही बाधित विद्यार्थांचे शैक्षणिक पालकत्व

Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) had organized Educational support program at Aamhi Sevak Sanstha Sevalaya Latur on 18/06/2017. In presence of Ex-Minister Shivraj Patil Team of HARC donated Educational materials like books, Stationary, Registers, School Bags, Note Books, School Uniform & Multivitamin Medicines to 71 Students of Sevalaya Project Hasegaon, Latur. HARC also paid Educational Fees of BCA students of Sevalaya. HARC appreciated students of 10th & 12th class who recently passed in SSC & HSC Exam.

**Location** : Sevalay Prakalp, Hasegaon, Latur

**Number of Beneficiary** : 66 PLHIV orphans of Sevalay, Latur

**Chief Invitee** : Ex-Union Home Minister Shivraj Patil

## PUNE – ALANDI – PANDHARPUR AIDS Awareness Cycle Rally


तरुण भारत परभणी औरंगाबाद, मंगळवार, ४ जुलै २०१७ ८

एचआयव्ही ग्रस्तांच्या हक्काविषयी जनजागृतीसाठी संवाद यात्रा

परभणीचे डॉ.पवन चांडक,गंगाखेडचे सचिन घोगरेंचा आळंदी-पुणे-पंढरपूर २७० किमी सायकल प्रवास

सायकल प्रवासातून एड्सबाबत जागृती

परभणीतील डॉक्टरचा उपक्रम : भिगवणमधील संस्थांशी साधला संवाद

प्रवासात युवकाची साथ

Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) President Dr Pawan S Chandak & Akash Gite organized HIV/AIDS awareness Cycle Rally between 29, 30th June 2017 from Pune Station – Alandi – Yawat – Chaufulla – Bhigwan- Indapur- Akluj- Velapur & destination at Paalvi AIDS Project Pandharpur. During this Rally Dr Pawan & Akash created awareness amongst General Public about HIV/AIDS, distributed pamphlets, communicated with general Public at various places especially Students of Mahatma Gandhi Vichar Manch at Saudamini Sabhagruh, Villagers of Bhigwan, Rotary Club Members & Nature Club Bhigwan, Warkari travelling to Pandharpur in various Dindi & Press Reporters at Velapur. At the end Rally ends at Paalvi Prakalp where more than 80 Students with HIV/AIDS are rehabilitated. At Paalvi Prakalp HARC Trustee Dr Pawan purchased various hand made handicraft material made by Paalvi Prakalp members & sold them at various colleges & Social gatherings of Parbhani. Through such activity we can help these students to become self Independent.

## Awareness about Family Planning & Population Control


पुढारी

# होय... मी नसबंदी करून घेतली !

डॉ. चांडक यांची जनजागृतीसाठी स्वत:पासूनच सुरुवात

आज जागतिक लोकसंख्या दिन

पुढारी

# शस्त्रक्रिया अगदी सोपी : डॉ. चांडक


मधुरिमा

डॉ पवन चांडक

# हो, मी नसबंदी करून घेतली

Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) President Dr Pawan S Chandak has written various articles in Newspaper on 11th July 2017. Motto is to make General Public aware about various Family Planning Measures like Tubectomy, Vasectomy for the purpose of National Mission 'Population Control'. DR Pawan Chandak himself done Vasectomy & shared his experience with General Public through articles & Social Media Post to go for Vasectomy surgery which is more easier, safe & convenient than other Birth Control measures.

## HARC organized 'Rakhi Stall exhibition' made by Sevalay PLHIV students at Department of Microbiology, DSM College to support & help PLHIV orphans of Sevalay Prakalp Hasegaon Latur in August 2017

लोकमत

**परभणीत उपलब्ध केल्या वस्तू :** होमिओपॅथिक अकादमीचा निर्मितीकडून प्रकाशाकडे उपक्रम

# सेवालयातील विद्यार्थ्यांनी बनविल्या राख्या, गणपतीमूर्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** लातूर येथील आम्ही सेवक संस्था सेवालयातील ७१ एचआयव्ही बाधित अनाथ बालकांनी स्वयंरोजगारातून राख्या आणि श्री गणेशमूर्ती तयार केल्या आहेत. येथील होमिओपॅथिक अकादमीने या राख्या, गणेशमूर्ती परभणीकरांसाठी उपलब्ध करून दिल्या असून, यातून मिळणारा निधी एचआयव्ही बाधितांच्या पुनर्वसनासाठी दिला जाणार आहे.

आम्ही सेवक संस्था सेवालय या ठिकाणी ७१ एचआयव्हीबाधीत बालकांचे पुनर्वसन प्रकल्प सुरु केला आहे. यामध्ये संस्थापक रवि बापटले हे मुलांना स्वयंरोजगाराचे धडे देतात. सेवालयातील स्नेहा शिंदे, मंदोदरी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांना प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणातूनच एचआयव्हीबाधीत मुलांनी विविध प्रकारच्या आकर्षक राख्यात बनविल्या आहेत. तसेच आगामी काळात येवू घातलेला गणेशोत्सव लक्षात घेऊन सुबक गणेशमूर्तीही घडविण्यात आल्या आहेत. एचआयव्हीबाधित मुलांनी स्वयंरोजगाराकडे टाकलेले हे पाऊल ठरत आहे. या मुलांनी तयार केलेली उत्पादने घराघरात पोहोचावीत आणि मुलांचा उत्साह वृद्धिंगत होऊन त्यांनाही रोजगार उपलब्ध व्हावा, या उद्देशाने परभणीतील होमिओपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज या संस्थेने पुढाकार घेतला आहे. 'निर्मितीतून प्रकाशाकडे' हा उपक्रम ही संस्था राबवित आहे.

यापूर्वी सेवालयात तयार झालेले २२८ किलो आंबे होमिओपॅथिक अकादमीने परभणीत विक्री करून २२ हजार ८०० रुपयांची मदत या मुलांना केली होती. एचआयव्हीबाधीत अनाथ मुलांच्याच निर्मितीला प्रकाशाच्या दिशेने नेण्याचे काम सुरु असल्याची माहिती एचआरसीचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांनी दिली. याचाच एक भाग म्हणून या मुलांनी तयार केलेल्या २४ प्रकारच्या राख्या परभणी येथे विक्रीसाठी उपलब्ध केल्या आहेत. तसेच १० ऑगस्टपासून गणेशमूर्तीही परभणीतील नागरिकांसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे चांडक यांनी सांगितले.



### मुलांचे स्वीकारले पालकत्व

- परभणी येथील होमिओपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज ही संस्था १० वर्षांपासून एचआयव्हीबाधीत मुलांच्या हक्कासाठी काम करीत आहे. या मुलांचे पालकत्वच संस्थेने स्वीकारले असून, या अनाथ मुलांचा सर्वांगीण विकास करणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि व्यवसाय व प्रशिक्षणासाठी मुलांना वस्तूरुपी मदत करण्याचे काम केले जात आहे. त्यातूनच मुलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविला जात आहे. नागरिकांनी त्यात हातभार लावावा, असे आवाहन डॉ. पवन चांडक यांनी केले आहे.

Hello Parbhani
Page No. 4 Aug 05, 2017
Powered by: erelego.com

**HARC organized 'Rakhi Stall exhibition' made by Sevalay PLHIV students at Department of Microbiology, DSM College to support & help PLHIV orphans of Sevalay Prakalp Hasegaon Latur in August 2017**






## HARC Donates Dettol Soap & Hygiene kit to 66 PLHIV orphans at Sevalay Prakalp Hasegaon, Latur August 2017



गोदातीर समाचार

'एचएआरसी' तर्फे निर्मितीतून प्रकाशाकडे उपक्रमाची सुरुवात

एचआयव्हीग्रस्त विद्यार्थ्यांना मदत



**Location** : Aamhi Sevak Sanstha, Sevalay Latur

**Number of Beneficiary** : 71 PLHIV Orphans of Sevalay Latur

## GANPATI IDOL making & Exhibition, Sale stall at Parbhani

पुणे, शुक्रवार, ११ ऑगस्ट २०१७ । किंमत ₹ ५

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

www.esakal.com SakalNews Call Center : 9225800800 @esakalupdate

# सेवालयातील गणेश मूर्तींचे परभणीकरांना गारुड

परभणी, ता. १० (बातमीदार) : होमिओपॅथिक ॲकॅडमी ऑफ रिसर्च ॲड चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेतर्फे बुधवारी (ता. ९) [illegible] टॉवर स्टेशन रोड येथे हासेगाव (जि. लातूर) येथील सेवालय प्रकल्पातील एचआयव्हीग्रस्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणेश मूर्तींचे प्रदर्शनात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत मूर्तींची खरेदी केली.

कार्यक्रमाचे उद्घाटन महापालिका आयुक्त राहुल रेखावार यांनी गणेश मूर्ती विकत घेऊन केले. कार्यक्रमास कृषिभूषण कांतराव देशमुख, सेवालयाचे संस्थापक रवी बापटले, कला व नृत्य दिग्दर्शक स्नेहा शिंदे, कला शिक्षक जोतिबा बडे, रितेश जैन, नगरसेवक अशोक डहाळे, डॉ. दीपक महिंदकर उपस्थित होते.



परभणी : कांतराव देशमुख यांनी आयुक्त रेखावार यांना गणेश मूर्ती भेट देऊन उद्घाटन केले.

१८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी आणि, यंदा आता गणेश मूर्ती तयार करून विक्री उपक्रमातून या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सेवालय व एचएआरसी ट्रस्ट सतत प्रयत्न करत आहे. एचएआरसी ट्रस्टच्या माध्यमातून सेवालयाला परभणीकरांची सतत प्रेम व मदत मिळत असल्याचे श्री. बापटले म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एचएआरसी संस्थेचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांनी केले. आयुक्त श्री. रेखावार यांनी सेवालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणेश मूर्ती विकत घेऊन या सामाजिक कार्यास हातभार लावण्याचे आवाहन केले.

कृषिभूषण देशमुख यांनी सेवालयातील कार्यावर प्रकाश टाकून अशा उपक्रमास प्रतिसाद देण्याचे आवाहन केले. सत्यनारायण चांडक यांनी आभार मानले. या उपक्रमातून आजवर सात हजार रुपयांच्या राख्या विकून सेवालयास मदत केली. याच वेळी डॉ. पवन चांडक यांनी सेवालयातील मुलांना महिनाभर पुरेल इतका पोषक आहारयुक्त साठा बापटले यांच्याकडे सुपूर्द केला. यशस्वितेसाठी डॉ. चांडक, डॉ. आशा चांडक, प्रा. डॉ. शिवा आयथॉल, विजय नागडिया, संदीप भंडे, मधुकर नायक, राजकुमार भांबरे, शंकर, संतोष इंगळे, हितेश शहा, संतोष वळणकर आदींनी पुढाकार घेतला.

PLHIV students of Sevalaya Latur have made Beautiful Ganesh Idol. So to support their Initiative & make them self Independent HARC organized Ganesh Idol Exhibition Stall at Parbhani. It was inaugurated by Shri Rahul Rekhawar IAS Hon. Commissioner of Muncipal Corporation on 9th August 2017. HARC raised fund around 50,000 by selling 108 Ganesh Idol & some Rakhis made by Sevalaya Student. On 25th August 2017 HARC donated RS 50,000 by cheque to Aamhi Sevak Sanstha at Sevalaya Hasegaon, Latur for the purpose of Rehabilitation activities of HIV students.

**Location** : Parbhani

**Number of Beneficiary** : 71 PLHIV orphans of Sevalay, Latur

**Chief Invitee** : Shri Rahul Rekhawar IAS Hon. Commissioner of Muncipal Corporation

## Sevalay PLHIV Students visit HARC's head office during Ganesh Festival for Cultural Program.

पुढारी

# 'हॅपी म्युझिक शो'ला उदंड प्रतिसाद

परभणी : प्रतिनिधी

गणेशोत्सवानिमित्त परभणी शहर महानगरपालिकातर्फे आयोजित 'परभणी फेस्टिवल २०१७' मध्ये सेवालय लातूर प्रस्तुत 'हॅपी म्युझिक शो' च्या ३१ व्या प्रयोगास परभणीकरांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला सेवालयातील मुलांच्या ढोलपथकाने सुरेख सादरीकरण केले. याच ढोल पथक साहित्यासाठी परभणीकरांच्या मदतीतून एचएआरसी ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांनी २५ हजाराची मदत केली होती. हा सांस्कृतिक कार्यक्रम सेवालय प्रकल्प हासेगाव (जि. लातूर) ने प्रस्तुत केला असून यात सेवालयातील एचआयव्ही सह जगणाऱ्या ४३ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील विविध लोकगीत जसे गोंधळ, माऊली माऊली, गवळण, लावणी, डोंबारी, कोळीगीत, वाघ्या मुरळी, धनगरी गीत, पोवाडा, राजस्थानी गीत, आदिवासी गीत, एकटी एकटी, टिपरीच्या ठेक्यावर त्यांच्या नृत्याविष्कारातून उत्कृष्ट कला सादर केल्या. या मुलांमध्ये कला जोपासण्यासाठी सेवालयाचे संस्थापक रवि बापटले व नृत्य दिग्दर्शक स्नेहा शिंदे यांनी परिश्रम घेतले. ९ ऑगस्ट रोजी झालेल्या सेवालयाच्या गणेश मूर्ती प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी महानगरपालिका आयुक्त यांनी या मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे म्हटले होते आणि त्याची प्रचिती परभणी फेस्टिवल मध्ये आयुक्त राहुल रेखावार यांनी लगेच सेवालयातील मुलांना परभणी फेस्टिवल मध्ये संधी देऊन मिळाली. यासाठी एचएआरसी ट्रस्ट चे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांनी विशेष पुढाकार घेतला. या प्रसंगी या मुलांच्या पुनर्वसन प्रकल्पासाठी मदत म्हणून मनपा परभणी फेस्टिवल उत्सव समितीतर्फे ३५,००० तर ड्रॉप बॉक्स मधून ८७७५/- रुपयांची मदत सेवालयास देण्यात आली. नाम फाऊंडेशनचे समन्वयक कांतराव देशमुख यांची मुलगी मेघा विलास देशमुख यांनी स्वतः ४० हजार रुपयांचा धनादेश रवि बापटले यांच्याकडे सुपूर्द केला. सूत्रसंचालन ज्योतिबा बडे व सुनील तुरूकमाणे यांनी केले. या प्रसंगी सेवालय संस्थापक रवी बापटले, राहुल रेखावार, प्रा. कमल व मंदाताई शिंदे, स्नेहा शिंदे, तनुजा यांना मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर यानिमित्त मनपा आयुक्त राहुल रेखावार, सेवालय संस्थापक रवी बापटले, स्नेहा शिंदे, स्थायी समिती सभापती गणेश देशमुख, सुनील तुरूकमाने, प्रवीण गोमचाळे, अमोल जाधव, सुभाष बाकळे, बंडू पाचलिंग, डॉ. दीपक महिंद्रकर, सत्यनारायण चांडक, डॉ. राजगोपाल कालानी, डॉ. जयश्री कालानी यांची उपस्थिती होती.




कलाविष्कार : परभणी फेस्टिव्हलमध्ये कलागुण सादर करताना सेवालयातील मुले.

### सेवालयास हातभार

एचएआरसी ट्रस्ट परभणीच्या पुढाकारातून या ७५ मुलांचे स्वेच्छेने पालकत्व स्वीकारून त्यांच्या शिक्षण, आरोग्य व पुनर्वसनासाठी २०१४ पासून वेळोवेळी मदत केली जाते. नुकतीच या मुलांनी तयार केलेल्या १०७ गणेशमूर्ती विक्री करून ५० हजाराची मदत सेवालयास देण्यात आली होती. या आधी या सांस्कृतिक कार्यक्रमाचे संपूर्ण महाराष्ट्रातील विविध भागात ३८ प्रयोग झाले असून त्याला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद देऊन या मुलांच्या पुनर्वसनासाठी त्यातून आर्थिक मदत देखील केली आहे. विशेष म्हणजे या सेवालय प्रस्तुत हॅपी म्युझिक शोच्या टीम मध्ये परभणीतील ५ विद्यार्थी आहेत.

My Parbhani/Hingoli
Page No. 03 Sep 05, 2017
Powered by: erelego.com



**Rahul Rekhawar IAS Commissioner of Parbhani Muncipal corporation doing Inauguration of HARC's Initiative of Ganpati Stall Exhibition at Padmawati Tower station road Parbhani.**



**Rahul Rekhawar IAS Commissioner of Parbhani Muncipal corporation doing Inauguration of HARC's Initiative of Ganpati Stall Exhibition at Padmawati Tower station road Parbhani.**

परभणी सोमवार २८ ऑगस्ट २०१७
सकाळ TODAY

# गणेश मूर्ती विक्रीतून सेवालयास ५० हजारांची मदत

**परभणी, ता. २७ (बातमीदार) :** होमिओपॅथिक अॅकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीजने सेवालय प्रकल्प लातूर येथील एचआयव्ही बाधित विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणेश मूर्ती विक्री प्रदर्शनातून ५० हजारांची मदत सेवालयास केली आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन महापालिका आयुक्त राहुल रेखावर यांच्या हस्ते ता. नऊ ऑगस्टला झाले होते. तेव्हापासून सोशल मीडियाच्या माध्यमातून परभणीकरांपर्यंत सेवालयातील मुलांनी तयार केलेल्या गणेश मूर्ती विक्री व त्यातून मिळणाऱ्या रकमेतून सेवालयातील एचआयव्ही बाधितांचे पुनर्वसन या उपक्रमाविषयी माहिती पोचवण्यात आल्याचे एचएआरसी ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांनी सांगितले. सेवालयातील मुलांनी तयार केलेल्या १०७ गणेश मूर्ती विक्री करून जवळपास पन्नास हजारांची मदत सेवालय प्रकल्पला धनादेशाद्वारे देण्यात आली. या उपक्रमासाठी सेवालय संस्थापक रवी बापटले, डॉ. आशा चांडक, सत्यनारायण चांडक, कृषिभूषण कांतराव देशमुख, गोपाल मुरक्या, राजू झंवर, डॉ. शिवा आयथॉल, वर्षा कालानी, डॉ. रामेश्वर नाईक, सीमा भट्टड, अभिजित मेटे, डॉ. ढमढेरे, संदीप भंडे, डॉ. दीपक महिंद्रकर यांनी पुढाकार घेतला.

## HARC organized 'Toilet Ek Premkatha' show for 200 children





लोकमत

# अनाथ मुलांना दाखविला 'टॉयलेट एक प्रेमकथा' चित्रपट

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : येथील होमिओपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अॅण्ड चॅरीटीजच्या वतीने अनाथ, दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या २०० बालकांना स्वातंत्र्य दिनी 'टॉयलेट एक प्रेमकथा' हा चित्रपट मोफत दाखविण्यात आला.

स्वच्छ भारत अभियान तथा पाणंदमुक्ती या संकल्पनेवर आधारित असलेल्या या चित्रपटाच्या माध्यमातून मुलांमध्ये स्वच्छतेचा संदेश पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला, असे होमिओपॅथिक अकादमीचे डॉ.पवन चांडक यांनी सांगितले. येथील अनुसया चित्रमंदिरमध्ये १५ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता या चित्रपटाचे आयोजन केले होते. जिल्हा निरीक्षण गृह, शासकीय बालगृह तथा चाईल्ड लाईन नेटवर्कशी संलग्नित बालकांनी या चित्रपटाचा लाभ घेतला. या जनजागृती उपक्रमासाठी हेमंतराव जामकर, अजिंक्य जामकर यांनी पुढाकार घेतला. यशस्वीतेसाठी एचएआरसी ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.पवन चांडक, चाईल्ड लाईनचे संदीप बेंडसुरे, कृष्णा फुलारी, सय्यद ईशरत, अर्चना दुधाटे, तेजस्विनी कांबळे, जिल्हा निरीक्षणगृहाचे उद्धव घुगे, शासकीय बालगृहाचे मुंडे, पवार आदींनी प्रयत्न केले.

Hello Parbhani
Page No. 4 Aug 18, 2017
Powered by: erelego.com

Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) Parbhani with support from Book a smile (Initiative of Book My Show) organized 'Toilet Ek premkatha' for 200 underprivileged Children at Anusaya E Square on 15th August 2017. This show is organized with motto to create awareness about Sanitation & good Toilet practices. All 200 underprivileged Children living in various Orphanage, Observational Home, and Slum area enjoyed it.

**Location** : Anusaya E-Square Theater Parbhani

**Number of Beneficiary** : 200 underprivileged children of Parbhani

## HARC organized AIDS Awareness Lecture at B Raghunath College Parbhani



लोकमत

# हॅलो परभणी

औरंगाबाद, मंगळवार, दि.२२ ऑगस्ट २०१७

## लग्नापूर्वी जोडीदाराची एचआयव्ही तपासणी करा

मार्गदर्शन : पवन चांडक यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क



On 19th August 2017 B Raghunath college organized HIV/AIDS Awareness Lecture by Dr Pawan S Chandak for the Students of College. In This Program Dr Pawan S Chandak given information about HIV virus, its mode of transmission, Dos & Don't, misunderstanding about HIV/AIDS, also shared his Journey of social work for HIV orphans he is doing since 2008. More than 200 Students & all teachers attended this Lecture. At the end Dr Pawan S Chandak given answers to various Questions asked by Students & Teachers about HIV/AIDS.

**Location** : B Raghunath College Parbhani

**Number of Beneficiary** : Nearly 200 students, teacher and staff attended program

## HARC Organized Diwali Celebration Program with 75 HIV Students of Sevalaya, Latur

पुढारी

# अशीही सामाजिक दिवाळी साजरी

## एचआयव्हीसह जगणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांसोबत सेवालयात फटाकेमुक्त उत्सव

**परभणी:प्रतिनिधी**

कोणतेही फटाके न फोडता, प्रदूषण तथा पर्यावरणाची हानी टाळून, उगाच तेलकट फराळ न देता हसेगाव, लातूर येथील सेवालयातील ७५ एचआयव्ही संक्रमित विद्यार्थ्यांसोबत आगळीवेगळी पोषक आहारयुक्त दिवाळी परभणीतील होमिओपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज या संस्थेतर्फे साजरी करण्यात आली.



**उपक्रम :** सेवालयातील मुलांबरोबर फटाकेमुक्त दिवाळी साजरी झाली.

याप्रसंगी बी. रघुनाथ महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा.गायकवाड यांनी मुलांना फराळाचे वाटप केले. रवी बापटले यांनी डॉ.पवन चांडक यांच्या २५ ऑक्टोबरपासून सुरु होणाऱ्या एड्स जनजागृतीसाठी १००० किलोमीटर लांबीच्या दक्षिण भारत सायकल मोहिमेला शुभेच्छा देऊन सन्मानित केले. सेवालयचे संस्थापक रवी बापटले, हॅपी म्युझिक शोच्या नृत्यदिग्दर्शिका स्नेहा शिंदे, प्रा छगन शिंदे, कर्नल राऊत व प्रा.राऊत उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. चांडक, शिवा ऐथल, योगेश बलदवा, सत्यनारायण चांडक, श्रीकांत शुक्ला, प्रा. गायकवाड, संत ज्ञानोपासक कॉलेजचे विद्यार्थी, डॉ. स्मिता भुतडा, ओम तलरेजा, मनोज कुचेरिया यांनी प्रयत्न केले. मागील काही वर्षांपासून डॉ.चांडक विविध उपक्रमांच्या माध्यमातून सेवालयास मदत करीत आहेत. त्याला परभणीकरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. जून २०१४ पासून जीवनरेखा बालगृहातील मुले सेवालय प्रकल्प (लातूर) येथे स्थलांतरित झाली. तेव्हापासून होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीजतर्फे या मुलांच्या विविध शिक्षण, आरोग्य व पुनर्वसन गरजांसाठी एड्स जनजागृती सायकल यात्रा, हॅपी म्युझिक शो, आंबे विक्री, राखी विक्री, गणपती मूर्ती प्रदर्शन व विक्री इत्यादी विविध उपक्रमातून वेळोवेळी मदत करतात.

My Parbhani/Hingoli
Page No. 02 Oct 20, 2017
Powered by: erelego.com

Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) Parbhani celebrated Pollution Free Diwali with 75 HIV students of Sevalaya Hasegaon Latur. In This Program HARC donated Sweets, nutritious Foods, Sprout, Namkeen to Sevalaya 75 Students. HARC donated RS 10,000 by cheque for New Dressing for the purpose of Happy Music Show. All students enjoyed this program.

**Location** : Sevalay Prakalp, Hasegaon, Latur

**Number of Beneficiary** : 71 PLHIV orphans of Sevalay, Latur

## HARC organized Bangalore Kerala Kayakumari 1000 km Cycling for AIDS awareness.



पुढारी

# हजार किलोमीटरचा सायकल प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण

## एचआयव्ही बाधित बालकांच्या हक्कासाठी काढली सायकलयात्रा, परभणीतील डॉ.पवन चांडक, डॉ.संदीप साखरे यांचा उपक्रम

परभणी : प्रतिनिधी

### असा झाला प्रवास

My Parbhani-Hingoli
Page No. ... Nov 04, 2017
Powered by: erelego.com



# HARC organized Bangalore Kerala Kayakumari 1000 km Cycling for AIDS awareness.

नांदेड, शनिवार, ४ नोव्हेंबर २०१७ । किंमत ₹ चार
सकाळ
महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

## दोन डॉक्टरांनी पूर्ण केली सायकल मोहीम

### एक हजार किलोमीटरचा प्रवास आठ दिवसांत पूर्ण

परभणी, ता. ३ (बातमीदार): एचआयव्ही बाधित बालकांच्या हक्कासाठीचा बेंगलोर ते कन्याकुमारी असा एक हजार किलोमीटरचा सायकल प्रवास डॉ. पवन चांडक व डॉ. संदीप साखरे या परभणीतल्या डॉक्टरांनी यशस्वीपणे पूर्ण केला आहे. प्रवासादरम्यान त्यांनी सुरक्षित लैंगिक संबंधाची माहिती दिली.

एचआयव्ही बाधित अनाथ बालकांचे मूलभूत प्रश्न शिक्षण, आरोग्य व पुनर्वसन व व्यवसाय प्रशिक्षण या विषयावर आजही परिपूर्ण अशा उपाययोजनेची गरज आहे. कर्नाटक, केरळ व तामिळनाडू या राज्यात वाढत्या औद्योगिकरण व कामगारांचे स्थलांतर व त्यामुळे महिनेमहिने कुटुंबापासून दूर राहिल्याने असुरक्षित लैंगिक संबंध हे घटक एचआयव्हीच्या प्रसारासाठी कारणीभूत आहेत. या मूलभूत प्रश्नावर जनजागृती व्हावी यासाठी होमिओपॅथिक ॲकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीजचे अध्यक्ष डॉ. पवन सत्यनारायण चांडक व पक्षीमित्र डॉ. संदीप साखरे यांनी ता. २५ ऑक्टोबर ते एक नोव्हेंबरदरम्यान बेंगलोर -केरळ- कन्याकुमारी असा एक हजार किलोमीटरचा सायकल प्रवास कोणतीही सुखसुविधा न घेता, हॉटेल, लॉजचा मुक्काम टाळून, सर्व सामान सायकलवर बांधून सर्व प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत हा प्रवास आठ दिवसात पूर्ण केला. मधल्या काही भागात त्यांना के. दिनेश, श्री प्रसून, डॉ. चंद्रशेखर मालेराव, डॉ. किरण बकाल, ॲम तलरेजा, सनथ जैन, कैलास शिंदे, माळली खिटिंग, डॉ. कन्नन, डॉ. शाखी कोल्लम, श्रीजीथ कोषिकोड, डॉ. दीपू आलेप्पी व वडकरा रायडर्स, मलबार रायडर्स, कॅलीकत पॅडलर्सच्या सायकलीस्टची काही ठराविक अंतरासाठी साथ लाभली.

गोनिकोप्पल, ब्रह्मगिरी जंगलातून मार्ग काढत केरळ मधील इरिट्टी गाठले. पुढे मतनूर, कुतूपरंबा, पानूर मार्गे सायकल चालवत पॉंडेचेरी राज्यात प्रवेश केला. कोल्लम, त्रिवेंद्रम मार्गे ता. ३१ रोजी कन्याकुमारी गाठले. एक नोव्हेंबर रोजी कन्याकुमारी येथील विवेकानंद केंद्र, त्रिवेणी संगम येथील उपस्थित पर्यटकांना जनजागृतीपर पत्रकाचे वाटप केले. लॉयन्स क्लब, आयएचएमएतर्फे शासकीय होमिओपॅथिक रुग्णालय त्रिवेंद्रम येथे आयोजित कार्यक्रमात शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत डॉ. चांडक व डॉ. साखरेंचा गौरव करण्यात आला.



परभणी: डॉ. पवन चांडक व डॉ. संदीप साखरे.

#### एड्स जनजागृतीपर माहिती पत्रकांचे वाटप

बेंगलोर रेल्वे स्टेशन येथे ता. २५ ऑक्टोबर रोजी कर्नाटक आरोग्य विभाग संचालक गोविंद राजू यांनी या एड्स जनजागृती सायकल फेरीस झेंडा दाखविला. पुढे त्यांनी रामनगर, चिन्नापटनम, मंड्या मार्गे जात ठिकठिकाणी प्रादेशिक भाषेतील एड्स जनजागृतीपर माहिती पत्रके वाटप केली.





## HARC organized Bangalore Kerala Kayakumari 1000 km Cycling for AIDS awareness.



# ഡോ. പവനും സംഘവും സൈക്കിളിൽ യാത്രതുടരുന്നു; എയ്ഡ്സിനെതിരേ

Sun, 29 October 2017
digitalpaper.mathrubhumi.com/c/24101829

Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) President Dr Pawan S Chandak & his team mates DR Sandip Sakhre, Dr Kiran Bakan, Dr Bhalerao, Mauli Khating, Kailash Tithe, Om Talreja, Sanath Jain travelled on Bicycle during 25th October to 1st November 2017 from Bangalore – Kanyakumari. During this Cycling expedition they had distributed AIDS awareness pamphlets & Dr Pawan has given lectures at various places especially Shrirangpatnam, Virajpet, Vadakara, Kozhikode, Guruvayur, Ernsakulam, Cherthala, Allepey, Kollsam, Trivendrum & Kanyakumari. Indian Homoeopathic Medical Association (IHMA) has given full support like organizing Awareness Programs during Kerala expedition. More than 5000 students, Teachers & General Public of various schools, college, Institutions, Hospitals have attended AIDS awareness functions. At Trivandrum Concluding ceremony was conducted at Govt Homeo Hospital Trivandrum where state level Lions Club chairperson & Kerala AIDS Control Society Office Bearers felicitated Dr Pawan & Team.

# Special Story by Dainik Punyanagari on HARC President DR Pawan S Chandak's 32000 km cycling Journey on HIV/AIDS Awareness



बुधवार, २२ नोव्हेंबर २०१७ । किंमत : ४.०० । मुंबई । वर्ष : १८ । अंक : २२९ । पाने १२+४=१६

# पुण्य नगरी

6 Edit Page । मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, बारामती, सोलापूर, नाशिक www.epunyanagari.com । Call Center 18001206252

## सुखद धक्का

। डॉ. पवन चांडक

## जनजागृतीसाठी ३२ हजार कि.मी.चा सायकल प्रवास

[illegible]

## AIDS Awareness Rally on World AIDS Day on 1st December 2017

### एचएआरसी ट्रस्टच्या वतीने सायकल रॅली

◆ परभणी येथील एचएआरसी ट्रस्टच्या वतीने जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त परभणी-जिंतूर अशी सायकल रॅली काढण्यात आली. होमियोपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च ॲण्ड चॅरिटीज ट्रस्टच्या वतीने शुक्रवारी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅली दरम्यान एचआयव्ही बाधित बालकांचे मुलभूत हक्क, शिक्षण, आरोग्य व पूनर्वसन विषयीची जनजागृती करण्यात आली. ही रॅली परभणी, झरी, बोरीमार्गे परभणी- जिंतूर ५० कि.मी. व जिंतूर- परभणी ५० कि.मी. अशी १०० कि.मी. काढण्यात आली.



या रॅलीमध्ये ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, डॉ.शिवा आयथॉल, दीपक तळेकर, जिंतूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रविण मोरे, प्रा.घुगे आदी सहभागी झाले होते.



## AIDS Awareness Rally on World AIDS Day on 1st December 2017

पुढारी

# राज्यात सव्वातीन लाख एचआयव्ही बाधित रुग्ण

**० ते १८ वयोगटात २३ हजारांपेक्षा अधिक जणांचा समावेश; महिला व पुरुषांत थोडीच तफावत**

परभणी : दिलीप माने

[illegible]

### अनुरक्षा गृहाची कमतरता

राज्यात अनुरक्षागृहे आहेत, पण १८ वयोगटातील बालकांची संख्येनुसार हे गृह अत्यंत कमी आहेत. ही मुले दुर्धर आजाराग्रस्त असून त्यांना प्रवेशासाठी कोणतेही प्राधान्यक्रम नाही. [illegible]

जागतिक एड्स दिन

### अनाथांसाठी योजना नाही

१८ वर्षे पूर्ण झालेल्या एचआयव्हीसह जगणाऱ्या अनाथ विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासनस्तरावर प्राधान्याने कोणतीही योजना नसल्याचे उघड झाले. [illegible] रोजीरोटीचा प्रश्न अत्यंत बिकट होत जातो.

परभणी : एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृती करण्यासाठी ३२ हजार कि.मी. सायकल प्रवास करणारे डॉ. पवन चांडक.



### ३२ हजार कि.मी. सायकल प्रवासातून केली जनजागृती केली

आजवर २०१३ पासून एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृतीसाठी ७ राज्यांतून ३२ हजार कि.मी. सायकल प्रवास केला. विविध शाळा, महाविद्यालय, सामाजिक संस्था आदींना भेट देऊन हजारो विद्यार्थी, नागरिक, सामाजिक कार्यकर्त्यांशी संवाद साधला. मुंबई ते कोकण ४०० कि.मी., परभणी ते पणजी ७५० कि.मी., पंढरपूर ३०० कि.मी., विदर्भ ८२० कि.मी., पुणे ते महाबळेश्वर ३८० कि.मी., सुरत, चित्तोडगड, गुजरात, राजस्थान ८०० कि.मी., गडचिरोली २८० कि.मी., बेंगलोर, केरळ, कन्याकुमारी १ हजार कि.मी. अशा विविध मोहिमेतून जनजागृती केली, असाच प्रयत्न शासनाने करणे अपेक्षित आहे.

– डॉ. पवन चांडक, होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज, परभणी.

Aurangabad
Page No. 05 Dec 01, 2017
Powered by: erelego.com

ON 1st December 2017 Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) President Dr Pawan S Chandak & his team mates Dr Shiva Aithal, Rajendra Khapre & Deepak Talekar travelled from Parbhani – Jintur-Parbhani 100km. During this cycling they created awareness at various places. At Jintur Large rally organized in Presence of Doctors, Policemen, Teachers, businessmen & Social workers & school students in Jintur. At the end Rally Concluded at Dr Babasaheb Ambedkar statue Jintur where DR Pawan S Chandak given talk on HIV/AIDS, its information, mode of transmission & work done by HARC since 2008. This function was attended by more than 200 peoples present there. Dr Pawan S Chandak written various article in Marathi Newspaper about HIV/AIDS, its present status, problems faced by People especially children living with HIV/AIDS.

**Location** : Parbhani , Jintur

**Number of Beneficiary** : 71 PLHIV orphans of Sevalay, Latur

**Chief Invitee** : Police Inspector Pravin More

## HARC Donated RS 51000 to Sevalaya for Happy Music Show Dressing

सकाळ 5 of 16

# सेवालयाला ५१ हजारांची मदत

परभणी, ता. २६ (बातमीदार) : दिवंगत बाबा आमटे यांची जयंती मंगळवारी (ता. २६) सामाजिक कृतज्ञता दिन म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्ताने होमिओपॅथिक अॅकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज ट्रस्टतर्फे सेवालयाला ५१ हजारांची मदत करण्यात आली.

पद्मावती टॉवर स्टेशन रोड येथे झालेल्या कार्यक्रमात सेवालयाचे संस्थापक रवी बापटले, प्रा. छगन शिंदे, स्नेहा शिंदे यांच्याकडे रकमेचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. या वेळी ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, डॉ. दीपक महिंद्रकर, तळेकर, रवी कदम, गोपाल मुरक्या, श्री. झंवर, बाळासाहेब काळे, पंकज क्षीरसागर, हितेश शहा, पंकज चांडक, श्रीकांत उबाळे यांची उपस्थिती होती. यशस्वीततेसाठी डॉ. शिवा आयथॉल, विशाल तोष्णीवाल, संतोष विठाळकर, अनुराधा जोशी, सत्यनारायण चांडक, रवी कुमार मौर्य, संजय बियाणी, संतोष इंगळे, सचिन लड्डा, डॉ. स्मिता भुतडा, योगेश बलदवा आदींनी पुढाकार घेतला.



परभणीः सामाजिक कृतज्ञता दिनानिमित्ताने होमिओपॅथिक अॅकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज ट्रस्टतर्फे हसेगावच्या सेवालय प्रकल्पास ५१ हजारांची मदत करण्यात आली.

On 26th December 2017 'Samajik Krutdnyata Din' is celebrated all over Maharashtra. On this Day Homoeopathic Academy of Research & Charities organized lecture of Sevalaya Founder Ravi Baptale at Padmawati Tower Parbhani This program was attended by HARC members, press reporters, social workers etc. Ravi Baptale shared his experience about Sevalaya since its foundation 2007, various his fights for Rights of Education for HIV students, Vocational Training, Happy Music Show, Ganpati Idol, Farming etc. On this occasion HARC President donated RS 51000 to Aamhi Sevak Sanstha Sevalaya Latur for the purpose of New Dressing & Costumes for Cultural Program' Happy Music Show'.

**Location** : Parbhani

**Number of Beneficiary** : 71 PLHIV orphans of Sevalay, Latur

## HARC Celebrated Makarsankrati with 100 Deaf, Dumb & Handicap Children


# १०० किलोमीटर सायकलिंगमधून मूकबधिर विद्यार्थ्यांना मदत

वसमत : तालुक्यातील खांडेगाव येथील अस्थिव्यंग, मूकबधिर व मतिमंद निवासी शाळेमध्ये होमिओपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज ट्रस्टतर्फे तिळगूळ लाडूचे वाटप केले.



On 14th January 2018 HARC President Dr Pawan S Chandak & his teammates cycled from Parbhani – Wasmat – Parbhani with board of AIDS & Environment Awareness. During this travel they visited Residential School at Khandegaon Wasmat for 50 Handicap, Deaf & Dumb students. HARC donated Nutritious Foods to them & celebrated Sankranti with them. After that HARC Team visited Navjeevan Mukbadhir Vidyalaya at Bharti Camp tq Purna where HARC donated New School Uniform & Nutritious Laddu. HARC Team celebrated Makarsankrati Festival with them. Total 100 Deaf, Dumb & Handicap Students are benefitted by this activity.

**Location** : Bharti Camp Dist Parbhani & Wasmat Dist Hingoli

**Number of Beneficiary** : 100 Divyang, Deaf & Dumb Students

## HARC donated 2 Bicycles to Students of Sevalaya Latur

लोकमत

सोनेरी दिवस ग्रुपचा उपक्रम : सामाजिक बांधिलकी जपली

# विद्यार्थ्यांना सायकलींची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : १९७७-७८ सालच्या स्टेनोग्राफीच्या मित्रांनी स्थापन केलेल्या 'सोनेरी दिवस, सोनेरी माणसं' या ग्रुपच्या वतीने नुकताच लातूर येथील सेवालयातील एचआयव्ही बाधित बालकांना सायकलींची भेट देण्यात आली.

येथील सत्यनाराण चांडक यांच्या निवासस्थानी या ग्रुपचा स्नेहमिलन कार्यक्रम पार पडला. यावेळी अरूण देशपांडे, गोपीकिशन जांगडा, वसंत तडवळकर, पद्माकर देशपांडे, रवी कुलकर्णी, शरद यन्नावार, वेणू गाढे, जया पाठक, अनुराधा भंडारी, लिला कुलथे, लता देशपांडे, अरुण देशपांडे, हेमा जोशी, सुभाष कुलथे, दिवाकर काकडे, स्मिता देशपांडे , संध्या अस्थना आदींची उपस्थिती होती. सेवालय लातूर येथे भरीव कार्य केल्याबद्दल डॉ.पवन चांडक यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सामाजिक जाणीवेतून ग्रुपने जमा केलेल्या १२ हजार ७०० रुपयांच्या निधीतून सेवालयातील दोन गरजू विद्यार्थ्यांना सायकल भेट देण्यात आल्या. याप्रसंगी सेवालयाचे रवी बापटले यांची उपस्थिती होती. यापुढे असेच सामाजिक बांधिलकीचे कार्यक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.



'सोनेरी दिवस, सोनेरी माणसं' ग्रुपच्या वतीने सेवालय प्रकल्पातील विद्यार्थ्यांना सायकल घेण्यासाठी डॉ.पवन चांडक यांच्याकडे धनादेश देताना घेतलेले छायाचित्र.

Hello Parbhani
Page No. 3 Mar 12, 2018
Powered by: erelego.com

## HARC donated 2 Bicycles to Students of Sevalaya Latur




25th February 2018 HARC Team visited Sevalaya Project & have talk with various problems of HIV students above 18 years of age travelling from Hasegaon to Latur by Bus. So relieve stress of waiting at Bus stand & also time HARC donated RS 13000 to Aamhi Sevak Sanstha Sevalaya for purchasing 2 Bicycles for Students of Sevalaya. Sevalaya Founder Ravi Baptale immediately utilized it by purchasing 2 Bicycle. Students were happy with this Bicycle.

**Location** : Aamhi Sevak Sanstha Sevalay Prakalp Hasegaon, Latur & Parbhani

**Number of Beneficiary** : 2 PLHIV orphans of Sevalay, Latur

## HARC Donated Sanitary Pad to Girls of Sevalaya Latur



दैनिक दिव्य मराठी

औरंगाबाद मंगळवार, २० फेब्रुवारी २०१८

# सेवालयातील विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप

प्रतिनिधी | परभणी

मासिक पाळीतील स्वच्छता आणि सॅनिटरी पॅडच्या वापराविषयी जनजागृतीसाठी सेवालय प्रकल्पातील २५ विद्यार्थिनींना अक्षय कुमारचा पॅड मन हा चित्रपट दाखवण्यात आला. तसेच सोमवारी (दि.१९) येथील एचएआरसी ट्रस्टतर्फे किमान ६ महिने तरी पुरतील एवढे नामांकित कंपनीचे ३ बॉक्स सॅनिटरी पॅड सेवालयातील मुलींसाठी पाठवण्यात आले. मासिक पाळीत मुलींचे आरोग्य चांगले राहावे व सोबत योग्य स्वच्छता राखता यावी, यासाठी घरगुती कापडाऐवजी सॅनिटरी पॅड वापरावे, यासाठी हसेगाव येथील सेवालय प्रकल्प व एचएआरसी ट्रस्ट नेहमीच प्रयत्नशील असून या विषयी जनजागृतीसाठी विविध प्रबोधनपर व जनजागृती उपक्रम आयोजित केले जातात. सेवालयातील एचआयव्हीसह जगणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक, आरोग्य व पुनर्वसनपर गरजांसाठी येथील होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एचएआरसी) ट्रस्ट ही संस्था २०१४ पासून नियमितपणे वेळोवेळी मदत करत असते.

या उपक्रमासाठी एचएआरसी ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, डॉ. आशा चांडक, डॉ. शिवा आरबोल, डॉ. महेश अवचट, सेवालय प्रकल्प रवी बापटले, स्नेहा शिंदे यांनी पुढाकार घेतला.



In February 2018 Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) organized Menstrual Hygiene Awareness Program for HIV Students of Sevalaya by giving Information to them about Good Hygiene & Sanitation Practices & Basic Information about Menstrual Cycle also. All Girls has shown 'Padman' movie by Akshay Kumar. HARC donated 3 box of Sanitary pad to fulfill Menstrual Hygiene needs of them up to 6month period. Nearly 25 girls have been benefitted by this activity.

**Location** : Aamhi Sevak Sanstha Sevalay Prakalp Hasegaon Latur

**Number of Beneficiary** : 25 PLHIV orphans Adolescent Girls of Sevalay, Latur

## HARC organized Charity 'Dhol Show' by HIV students of Sevalaya

पुढारी



परभणी : सेवालयाच्या ढोलपथकाने ब्राह्मणगाव फाटा येथे आयोजित धार्मिक कार्यक्रमाप्रसंगी सादरीकरण केले. यावेळी मुले-मुली.

# सेवालयाच्या ढोलपथकास नागरिकांचा प्रतिसाद

परभणी : प्रतिनिधी

प.पू. रंगनाथ महाराज काळदाते गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त ब्राह्मणगाव येथे दि.१३ मार्च रोजी आयोजित पालखी सोहळ्यात सेवालय प्रकल्प लातूर येथील ढोलपथकाने सादरीकरण केले. काळदाते गुरुजी परिवार व एचएआरसी ट्रस्टच्या पुढाकारातून कार्यक्रमाचे करण्यात आले होते.

या सोहळ्यात अध्यात्मातून सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने आयोजकांनी सेवालय प्रकल्प हासेगाव लातूर येथील विद्यार्थ्यांच्या ढोल पथकास आमंत्रित केले होते. या प्रसंगी आम्ही सेवक संस्था संचलित सेवालय प्रकल्पातील एचआयव्हीसह जगणाऱ्या २० अनाथ विद्यार्थ्यांनी ढोल, ताशा व माऊली माऊली गाण्यावर उत्कृष्ट कला व नृत्य सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. रंगनाथ महाराज समाधी मंदिर ते ग्रामपंचायतदरम्यान निघालेल्या पालखी सोहळ्यास गावकऱ्यांनी ठिकठिकाणी चौका चौकांत पुष्पवृष्टी व टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. ब्राह्मणगाव, आसपासचे गावकरी व परभणीतील शक्तिब्रह्माश्रम परिवारातील शेकडो बालगोपाल व गावकऱ्यांनी मुलांच्या ढोल सादरीकरणास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बाल सिनेअभिनेत्री तनुजा शिंदे हिने गणेश वंदनावर नृत्य सादर केले. याप्रसंगी लोकसहभागातून मिळालेल्या निधीतून एचएआरसी ट्रस्टतर्फे २५ हजाराची मदत प्रा.रवी बापटले यांच्याकडे डॉ.पवन चांडक, शशिकांत काळदाते यांनी सुपूर्द केली. तसेच सेवालयाच्या विद्यार्थ्यांच्या पुनर्वसन गरजांसाठी सात्वी १० गादी व १० दशादेतील एचएआरसी ट्रस्ट तर्फे देण्यात आल्या.

My Parbhani/Hingoli Edition
19 Mar, 2018 Page No. 2
Powered by : erelego.com

On 13th March 2018 Homoeopathic Academy of Research & Charities (HARC) organized 'Dhol Show' on occasion of Memory of Late Shri Rangnathrao Kaldate Guruji's Remembrance Day at Bramhangaon Tq. Parbhani. In This Program Sevalaya Students performed various Acts on Dhol & appreciated by Hundred of Villagers present there. At the end Small Act of Awareness was performed followed by Mauli Mauli song which is appreciated by thousand people present there. At the end Cheque of RS 25000 donated by HARC to Aamhi Sevak Sanstha Sevalaya Latur for the purpose of Vocational Training & Rehabilitation purpose of those HIV students who are above 18 years of age.

**Location** : Bramhangaon, Parbhani

**Number of Beneficiary** : 71 PLHIV orphans of Sevalay, Latur

## HARC Team gives talk on HIV/AIDS awareness at Youth Camp at Pokharni on 21st March 2018







ITI Parbhani had organized NSS Youth Camp at Pokharni on 21st March 2018. In This Camp HARC President Dr Pawan S Chandak has given lecture on Awareness about HIV/AIDS. This camp was attended by nearly 150 Students of ITI & 15 teachers and staff.

**Location** : Pokharni Dist Parbhani

**Number of Beneficiary** : 150 Students of ITI & 15 teachers and staff.

## Special Story

गणेश विशेष

# बाप्पाला घडवणारी मुलं...

डॉ. पवन चांडक

एचआयव्हीबाधित बालकांचे मूलभूत प्रश्न शिक्षण, आरोग्य व पुनर्वसन या विषयांवर कार्य करताना अनेकदा मी नेहमीच गणपती बाप्पाला प्रार्थना करायचो की 'बाप्पा आमच्या लेकरांना चांगले आरोग्य दे, बळ दे.'

याच बाप्पांच्या आशीर्वादामुळे एचआयव्हीसह जगणाऱ्या आमच्या चिमुरड्यांनी जिद्द, मेहनत, आत्मविश्वासाच्या जोरावर दीड महिन्यात ४०० गणेशमूर्ती तयार करून सुरेख पद्धतीने त्या रंगवून मणी, खडे यांची सजावट केलीय, तर आता म्हणायला हरकत नाहीय की 'आमची मुले आता बाप्पाला घडवायला लागलीत.'

२०१० ते २०१२ दरम्यान परभणी येथील एचआयव्हीबाधित अनाथ बालकांसाठी काहीतरी सकारात्मक कार्य करावे या उद्देशाने मी आणि माझे मित्र एचएआरसी संस्थेच्या माध्यमातून या मुलांशी जोडले गेलो होतो. या मुलांसाठी गणेशोत्सव म्हणजे अत्यंत आनंदाचा, जल्लोषाचा दिवस. या उत्सवाच्या निमित्ताने त्यांना बाहेरच्या जगात जाऊन गणपतीमूर्ती निवडणं, सजावटीसाठी पताका, कनात आणणं, थर्माकोलच्या मंदिराची सजावट ही सगळी मजा अनुभवता येते. हे सगळं करताना त्यांच्या प्रत्येक लहानसहान बाबींचा विचार करावा लागतो. ही मुलं एचआयव्हीग्रस्त असल्याने दहा दिवस त्यांच्या तब्येतीला मानवेल असा, दहा प्रकारच्या पौष्टिक आहारयुक्त नैवेद्याचे नियोजन करावं लागतं. रोज सकाळ-सायंकाळ आरती, आरतीला रोज नवनवीन पाहुणे, बाप्पा या सगळ्यात ती छान रमून जातात. दुसरी मी म्हणजे मुलांचे डॉक्टर अंकल लॅपटॉपवर नवनवीन ताहली, कार्टून चित्रपट दाखवतो. त्यांच्यासाठी हे दहा दिवस म्हणजे सर्वार्थाने भरगच्च मेजवानी असते. गणपती पूजा करताना अथर्वशीर्ष पठण, २१ दूर्वा तयार करणे, दूर्वांचा हार यातही मुले मस्त रमून जात.

एचआयव्ही असल्याने या मुलांची प्रतिकारशक्ती कमी असते, त्यामुळे टीबी, न्यूमोनिया, डायरिया अशा आजाराला ती पटकन बळी पडतात. २०१२ मध्ये दोन मुले, २०१३ मध्ये दोन मुली एड्समुळे मृत्युमुखी पडली होती. या मुलांचे अंतिम संस्कार करताना आम्ही बाप्पाला सांगितले होते की बाप्पा आमच्या मुलांना चांगले आरोग्य दे.

या मुलांचे जून २०१४ मध्ये सेवालय प्रकल्प लातूर येथे स्थलांतर झाल्यावर सेवालय संस्थापक रवी बापटले, कलाशिक्षक ज्योतिबा बडे आणि कला व नृत्यदिग्दर्शिका स्नेहा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ती स्वयंरोजगार व प्रशिक्षणाचे धडे घ्यायला लागली.

नुकत्याच या मुलांनी राखी पौर्णिमेसाठी राख्या तयार केल्या. केवळ लातूरच नाही तर आमच्या एचएआरसी संस्थेच्या माध्यमातून जवळपास सात हजार रुपयांच्या राख्यांची विक्री झाली. त्यास सर्व माता-भगिनींनी, स्टुडंट असोसिएशन इन मायक्रोबायोलॉजी ज्ञानोपासक कॉलेज, यशोधन पोगकी यांच्या सदस्यांनी प्रतिसाद देऊन मुलांचे कौतुक केले.

ज्योतिबा बडे हा दयानंद कला महाविद्यालयातील विद्यार्थी. त्याने सुचवले की ज्याच्या हातात जी कला असेल, त्याने ती या मुलांना शिकवायची. त्यातून २६ जूनच्या आसपास त्याने अर्जुन, आदिनाथ, अक्षय, शंकर या व इतरही एचआयव्हीसह जगणाऱ्या विद्यार्थ्यांना गणेशमूर्ती तयार करायला शिकवायला सुरुवात केली. सुरुवातीला शाडूचे गणपती तयार करण्याचा विचार होता. परंतु पावसाळा, दमट वातावरण यामुळे मूर्ती वाळण्यासाठी वेळ हवा होता. मग मुलांनी प्लास्टर ऑफ पॅरिसचाच पर्याय निवडला. त्याचे साहित्य, साचे, पीओपी, ऑइल बॉण्ड कलर, बॉडी कलर, कम्प्रेसर कुठून घ्यायचे वगैरे प्रश्न त्यांच्यापुढे होते. पण त्यातून मार्ग निघाला.

मग काय सुरू झाली मुलांची तयारी. चुकत चुकत मन लावून मुलं शिकू लागली. मूर्ती तयार करू लागली. गणपतीच्या सोंडेवरील नक्षीकाम असो की सिंहासन... दगडूशेठ हलवाई, लालबागचा राजा या मूर्ती मूर्तिमंत जमू लागल्या. मल्हारी गणपतीच्या मल्हार राजाच्या चेहऱ्यावरील भाव, पेहराव आणि मग रंग देताना पीतांबर, मुकुटाला रंग देताना शायनिंग, दगडूशेठ गणपतीचे सुंदर बोलके डोळे, लालबागच्या राजाचा पेहराव हे सगळं मुलांनी अत्यंत सुबक व सुरेख पद्धतीने केलं.

पुढचा टप्पा गणपतीला अलंकार व आभूषणे काढणे. सेवालयातील मुलींनी हे काम अत्यंत सुंदर केले. गणपतीचे वजन आपले उंदीर मामादेखील छान जमले.

हे सर्व तयार केल्यावर पुढे समाजापर्यंत पोहोचायचे हे सोपे काम नाही. लातूरहून परभणीला मूर्ती न्यायच्या म्हणजे त्यांना रद्दीच्या कागदाची बॉक्स पॅकिंग हे सगळं करण आलं. अक्षय व आदिनाथ यांनी मूर्ती छोट्या मालवाहू टेम्पोमध्ये व्यवस्थित पॅक करून खड्डेयुक्त रस्त्यावरून सहीसलामत परभणीला नेल्या. सर्व बॉक्स शिताफीने उघडून मस्त मांडले. प्रदर्शनासाठी गणपती नीटसपणे मांडले. सकाळी महानगरपालिका आयुक्त राहुल रेखावार यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. त्यांनी मल्हारी गणपती विकत घेऊन मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. तेव्हा प्रस्तावना करताना माझ्या तोंडातून आनंदाने शब्द निघाले,

'आता आमची मुले बाप्पाला घडवायला लागलीत'.....





response.lokprabha@expressindia.com

## Special Story on HARC's Social Activities

नांदेड, बुधवार, ८ नोव्हेंबर २०१७ । किमत ₹ तीन

**सकाळ**

# ३७ वर्षानंतर हुंड्याची रक्कम सामाजिक संस्थेला दान

## सत्यनारायण चांडक यांनी एकसष्ठीनिमित्त खाद्यसामग्री सेवालयाला दिली पाठवून



परभणी : सत्यनारायण चांडक यांनी एकसष्ठीनिमित्त खाद्यसामग्रीची तुला करताना.

कैलास चव्हाण

[illegible]



## Special Story on HARC's Social Activities



मधुरिमा

दिव्य मराठी

डॉ. पवन चांडक, परभणी

pavanchandak498@gmail.com

# सकारात्मक वैचारिक परिवर्तन

## Felicitation of HARC's Work






Felicitation of HARC Team Dr Pawan S Chandak by District Collector P Shivashankar on occasion of National Voter Day on 25th January 2018. Dr Pawan S Chandak honored as 'Youth Icon' for Voting awareness for year 2018. On this occasion District Collector P Shivashankar, Resident District Collector Ankush Pinate and Tehsildar Vidyacharan Kadavkar were present.

## Felicitation of HARC's Work






27 January 2018, In the recent state level seminar organized by SAM DNYANOPASAK College, Parbhani, HARC team Dr Pawan S Chandak felicitated by auspicious hands of Dr. Sandhya Tai Dudhgaonkar, Principal and Secretary of Dyanopasak College for the rehabilitation of the HIV /AIDS affected children. Speaking on the topic of Bioenergy on the occasion, Dr Pawan S Chandak gave guidance on cycling and the use of cycling to reduce pollution along with environmental awareness.

## Felicitation of HARC's Work



25th March 2018

Felicitation of HARC team member Dr Pawan S Chandak by Tehsildar Vidyacharan Kadavkar. Dr Pawan S Chandak has completed AIDS awareness Cycling expedition from Bangalore - Kerala - Kanyakumari 1000 km.




Bangalore - Kerala - Kanyakumari cycling Expedition